# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अतिक्रमण विभाग

दि.२९/०९/२०२२

**प्रेसनोट**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ‘बी’, ‘डी’ व ‘ई’ प्रभागांमार्फत नालासोपारा रेल्वे स्थानकालगत बसणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर दि.२७ सप्टेंबर व २८ सप्टेंबर २०२२ रोजी कारवाई करण्यात आली.

नालासोपारा रेल्वे स्थानकालगत ये –जा करणाऱ्या रस्त्यावर, फुटपाथवर अनधिकृत फेरीवाले बसत असल्यामुळे नागरिकांना ये-जा करणेस त्रास होत असल्याच्या तक्रारी, तसेच वाहतूक कोंडीच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त होत आहेत. या अनुषंगाने मा.आयुक्त व अति.आयुक्त यांच्या निर्देशानुसार नालासोपारा पूर्व व पश्चिम रेल्वे स्थानक लगत बसणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर दि.२७ सप्टेंबर व २८ सप्टेंबर २०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली. सदर कारवाईत अनधिकृत हातगाड्या, टपऱ्या यांवरील माल जप्त करण्यात आला असून सदर हातगाड्या व टपऱ्या जेसीबीच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आल्या. सदर कारवाई वेळी उप-आयुक्त श्री.अजित मुठे, सहा.आयुक्त श्रीम.विशाखा मोटघरे, प्र.सहा.आयुक्त श्री.मनोज वनमाळी, प्र.सहा.आयुक्त श्री.दयानंद मानकर तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी इ. उपस्थित होते.

अनधिकृत फेरीवाल्यांच्या बाबतीत महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरूच राहणार असून रेल्वे स्टेशन परीसराबरोबरच महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी ही कारवाई करण्यात येईल.

**अतिक्रमण विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**